कम्युनिटी पोलीसिंग अंतर्गत

# बुलडाणा जिल्हा पोलीस दल

## लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा - २०१२

# पॉक्सो - POCSO




संकल्पना :

**अरविंद चावरिया** भा.पो.से.

पोलीस अधीक्षक, बुलडाणा

# मुलांना कशाची गरज आहे

नागरिकत्वाची मूल्ये
संविधानिक मूल्ये
शाश्वत मूल्ये

सांस्कृतिक विकास

शिक्षण

बौध्दिक विकास

जीवन कौशल्ये

सामाजिक पुनर्वसन

पोषण

अभिव्यक्ति

विशेष गरजा

मनोरंजन



आरोग्य

सहभागिता

आदर

सुरक्षितता

प्रेम सुरक्षा

लैंगिक विकास

समुपदेशन

माहिती

स्वत:ची ओळख
निर्माण करण्याची
क्षमता

## बुलडाणा जिल्हा पोलीस दल

# लैंगिक अत्याचारांपासून बालकांचे संरक्षण कायदा - २०१२
## “जन जागृती”



# पॉक्सो - POCSO

संकल्पना :
**अरविंद चावरिया** भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, बुलडाणा

## कम्युनिटी पोलिसिंग

# बुलडाणा जिल्हा पोलीस दल

**प्रकाशन**

**मार्च २०२१**

॥ माहिती प्रसारण युगात
बालकांना जपणे,
त्यांचे संगोपन करणे व
त्यांना सक्षम बनविणे
ही प्रत्येकाची जबाबदारी
आहे नव्हे आद्य कर्तव्य
होय ॥

**मुद्रण स्थळ**

ओंकार ग्राफिक्स ॲण्ड पब्लिकेशन
कृष्णा, शास्त्री मोहल्ला, जालना
मो.क्र. ९८२२०७५२६, ८००७१७०८०८

**जनहितार्थ विनामूल्य वितरित**

Declaration : ही पुस्तिका केवळ एक संदर्भ पुस्तिका असून यातील मजकूर कोणत्याही न्यायालयात अथवा कार्यालयात जशाचा तसा ग्राह्य नाही. त्याकरिता संबंधीत कायद्याचे पुस्तकाचा / शासन निर्णयाचा संदर्भ घेण्यात यावा.

# मनोगत



**'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती'** या उक्तीचा अनुभव आम्हाला अनेकदा येत असतो कारण दररोज अनेक वेगवेगळ्या लोकांना भेटतांना, वेगवेगळे विषय हाताळताना या गोष्टींची जाणीव होत असते. आधुनिक काळात सर्वच क्षेत्रात बदल होत असताना गुन्हेगारीच्या स्वरूपातही बदल होत असल्याचे दिसून येते. अशा वेळेस स्थापित कायदे अपुरे पडतात. अनेक कायदे बनतात त्यांची अंमलबजावणी करताना, आपण गुन्ह्यांच्या उलगड्यापर्यंत पोहचलो असे वाटत असतानाच गुन्हेगाराने त्यात काढलेल्या पळवाटा व त्यावर शह देण्यासाठी कायद्याच्या चौकटीत राहून केलेला उलगडा, त्यात येणाऱ्या अडचणींना तोंड देण्यासाठी उदयास येणारे नवीन कायदे हे चक्र सतत चालूच असते.

आज मी सर्वांना अशाच कायद्याबाबत ज्ञात करू इच्छितो. हा कायदा **लैंगिक अत्याचारांपासून बालकांचे संरक्षण कायदा-2012 (पोक्सो-POCSO)** बालकांवर होणारे लैंगिक अत्याचार, लैंगिक छळ व अश्लिल साहित्यापासून बालकांचे संरक्षण करण्यासाठी विशेष महत्त्वाचा आहे. या कायद्याची अंमलबजावणी कशी होते हे सर्वांना माहित व्हावे असे या पुस्तकामागील प्रयोजन आहे.

बाललैंगिक अत्याचार थांबविणे ही पोलीसांसोबतच समाजाचीही जबाबदारी आहे. आपण सर्वांनी बालकांना सुरक्षित व संरक्षित वातावरण देण्यास कटिबध्द आहोत. पर्यायाने सशक्त भारत निर्माण करण्यास कटिबध्द आहोत.

आपल्यावर होणाऱ्या अत्याचाराविरूध्द आपण जगाशी लढू शकतो पण आपल्या स्वजनांशी, आप्तांशी लढण्यास असमर्थ ठरतो आणि आपला अंतर्गत कलह वाढत जातो व आपली अवस्था महाभारतातील अर्जुनासारखी होते. व आपली शस्त्रे आपोआपच गळून पडतात. परंतु अत्याचार करणारा कधीच आप्त असू शकत नाही. आपले कुटुंब आपले आप्त हे केवळ आपल्या कल्याणाचा, भवितव्याचा विचार करणारे असतात. अत्याचार करणारे नाही.

बालक भारताचे भविष्य आहे. परंतु त्याचबरोबर अत्याचाराला बळी पडणारा घटक आहे त्यांना सुरक्षित वातावरण देण्यासाठी पोलीस कटिबध्द आहे.

**अरविंद चावरिया** भा.पो.से.
**पोलीस अधीक्षक, बुलडाणा**

# लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायदा - २०१२

## पोक्सो - POCSO

### प्रयोजन

**बालकांबरोबरचे** लैंगिक गैरवर्तन स्पष्ट करण्यासाठी बाल लैंगिक अत्याचार (सीएसए) हा शब्द व्यापक अर्थानं वापरला जातो. सोप्या भाषेत, जेव्हा एखादी व्यक्ती तिच्या / त्याच्या लैंगिक समाधानासाठी, व्यावसायिक फायदा किंवा दोन्हीसाठी बालकांचा वापर लैंगिकतेसाठी करते/ करतो तेव्हा बाल लैंगिक अत्याचार घडतो. बालकांचे यापासून संरक्षण व्हावे व ते सुरक्षित व संरक्षित असावे. असा हा कायदा करण्यामागील उद्देश आहे.

**लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण, (पोक्सो - POCSO) अधिनियम, २०१२ आणि नियम २०१२** अंमलात आणला. न्यायालयीन प्रक्रियेसंबंधी बाल संरक्षण व बालकांच्या हिताचे प्रत्येक टप्प्यांमध्ये त्याच्या/ तिच्या खासगीपणाच्या आणि गुप्ततेच्या हक्कांचे संरक्षण व्हावे ही काळजी घेण्यात आली आहे. आणि ज्याअर्थी बालकाचा निकोप, शारीरिक, भावनिक, बौद्धिक व सामाजिक विकास होण्याची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने,बालकाला सर्वोच्च हितास व कल्याणास सर्वाधिक महत्त्व देऊन त्याकडे लक्ष देण्यात आले आहे. न्यायालयीन प्रक्रियेमध्ये संबंधित बालकाच्या हिताचे प्रत्येक पावलांवर रक्षण व्हावे ही काळजी यात घेतली गेली आहे. त्यादृष्टीने गुन्ह्याच्या पुराव्याची नोंद, ध्वनिमुद्रण (रेकॉर्डिंग), तपास

## प्रयोजन


हा बालसुलभ पद्धतीने व्हावा यावर भर दिलेला आहे. विशेष न्यायालयांची नेमणूक करुन खटल्याचा निकाल जलदगतीने लावण्याची तरतूद करण्यात आली आहे.

### बालकांचे हक्क

१) पालकांच्या सोबत राहण्याचा अधिकार आहे.
२) चांगले आरोग्य व उपयुक्त पोषणाचा अधिकार आहे.
३) स्थिर, प्रेमळ व नैसर्गिक वातावरणाचा अधिकार
४) समान संधीचा, सहभागिता व समस्यांचे निवारण
६) उच्चदर्जाचे शिक्षण घेण्याचा अधिकार
७) जबाबदार नागरिक बनण्याचा अधिकार
८) संरक्षणाचा अधिकार आहे.
९) आध्यात्मिक विकासाचा अधिकार आहे

### इतरांची जबाबदारी

- साध्या वेशात असलेल्या स्त्री पोलिसानी शक्यतोवर गुन्हा नोंदवून घ्यावा.
- या कायद्यात घडलेल्या गुन्ह्याचा तपास दोन महिन्यांतच पूर्ण करणे बंधनकारक आहे.
- पुरावे देण्याची जबाबदारी गुन्हेगारावर आहे.
- माध्यमांनी गुन्ह्याच्या स्वरूपाचे वर्णन करताना अचूक परिभाषा वापरावी.
- या पुस्तकांमधून बाललैंगिक अत्याचार कायद्याचा पालक व पीडित बालकांस उपयोग होईल ही अपेक्षा.



# बाललैंगिक अत्याचार
# ‘‘जन जागृती’’

## या संबंधीचे कायदे, अटी व नियम!



## प्रस्तावना

आजच्या आधुनिक म्हणवणाऱ्या समाजात, काळाच्या ओघात कुटुंब संस्थेचा विकास होत असताना महिलांचे कार्यक्षेत्र संकुचित होत गेले. त्याचा परिणाम की काय विभक्त कुटुंब पद्धतीचे पेव फुटले.

एक तर वाढते शहरीकरण, कुटुंबाचे शहरी भागांकडे स्थलांतर, विभक्त कुटुंबांमध्ये वाढ, कुटुंबांमध्ये वरिष्ठ सदस्यांचा अभाव, जास्त कामाच्या (ध्येयवादी जोडपे) वेळांमुळे घरी असलेल्या अपत्यांकडे दुर्लक्ष होत गेले. त्या मुळे कुटुंबाना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. काही विक्षिप्त गोष्टींचाही यांमध्ये समावेश होतो. ज्याचा आपण विचारही करू शकत नाही, अशा समस्या समोर येऊन उभ्या राहतात. उदा.- 'बाललैंगिक अत्याचार' या मधील गुन्हेगार शोधणे हे फार अवघड काम झाले आहे. कारण अत्याचार करणारा हा कोणीही असू शकतो. त्यावर शंका घेणे ही पाप समजले जाते. अशा व्यक्तीकडून होणाऱ्या अत्याचाराच्या, गुन्हेगारीच्या घडणाऱ्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढच होत आहे. कायदे अनेक केले गेले पण त्याची अंमलबजावणी कशी करावयाची हीच समस्या आहे.

# बाललैंगिक अत्याचार - “जन जागृती”

लहान मुलांच्या/मुलींच्या प्रत्येक हक्काचे संरक्षण करणे. यासाठी ‘जन जागृती’ करणे प्रत्येकाचे प्रथम कर्तव्य आहे. बाल वयातील अत्याचार त्याच्या खोलवर मनावर असा आघात करतो की तो कधीही न पुसणारा असतो. कलम - २ (१) (डी) च्या व्याख्येनुसार अठरा वर्षांपेक्षा कमी वयाची कोणतीही व्यक्ती ‘बाल’ असते आणि बालकांबरोबरचे लैंगिक गैरवर्तन स्पष्ट करण्यासाठी बाल लैंगिक अत्याचार (सीएसए) हा शब्द व्यापक अर्थाने वापरला जातो.सोप्या भाषेत, जेव्हा एखादी व्यक्ती तिच्या / त्याच्या लैंगिक समाधानासाठी, व्यावसायिक फायद्यासाठी किंवा दोन्हीसाठी बालकांचा वापर लैंगिकतेसाठी करते/करतो तेव्हा बालक लैंगिक अत्याचार घडतो.

**बालक संरक्षणाचे उपाय - एक गरज**

बाल लैंगिक अत्याचार थांबवणे आवश्यक आहे. बाल लैंगिक अत्याचार थांबविण्यासाठी भारतीय समाजानं एकत्रित प्रयत्न करायला हवेत. बालकांना सुरक्षित आणि संरक्षित ठेवण्याची जबाबदारी केवळ सरकारची नव्हे तर आपल्या बालकांना हिंसामुक्त मोकळ्या वातावरणात सन्मानाचं जिणं जगता यावं यासाठी सुरक्षित आणि संरक्षित वातावरण उपलब्ध करुन देणं ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

बाल लैंगिक अत्याचारांच्या अनेक घटना दररोज घडत असतात. त्यावर ठोस तोडगा काढणे आवश्यक आहे. ही ‘जन जागृती’ व्यापक प्रमाणावर करणे गरजेचे आहे. विविध सरकारी आणि सेवाभावी संस्थांच्या सहकार्याने बाल वयातील बालगुन्हेगारांचे पुनर्वसन करण्यास मदत करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. बालकांशी समन्वय साधणे गरजेचे आहे. नव्हे तर ती एक मोठीच जबाबदारी आहे.




## १ सामर्थ्य आणि विश्वास यांचा प्रभाव

लहान मुलींचाच लैंगिक छळ होतो असे नाही तर मुलांचाही होतो. यामध्ये मुलेच जास्त हतबल होत असतात. बाल लैंगिक अत्याचाराच्या बहुतेक प्रकरणांत, गुन्हेगारानं बालकाचा विश्वास संपादन केलेला असतो किंवा ते बालक त्याच्या सामर्थ्याखाली असतं. मुले लैंगिकतेबद्दल अनभिज्ञ असतात. गुन्हेगार हा बहुतेकदा अत्याचारग्रस्त बालकाच्या परिचयातलाच असतो. त्यामुळे ते लैंगिक छळाची कल्पना कशी करू शकणार, गेल्या काही वर्षांतल्या राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरोच्या (एनसीआरबी) अहवालानुसार ८० ते ९० टक्के प्रकरणात गुन्हेगार हा अत्याचारग्रस्त बालकाला 'ज्ञात' असतो. अर्थात अशीही काही उदाहरणे असू शकतात जेथे गुन्हेगार अगदीच अनोळखी असतो.



## २ गुन्हेगाराचं वय

गुन्हेगाराला वय नसतं असे म्हणणे वावगे ठरणार नाही कारण चार-पाच वर्षांच्या अल्पवयीन बालक / बालिकांवर त्या मुलाच्या आजोबा किंवा इतर प्रौढांनी अत्याचार केल्याच्या अनेक घटना नोंदविल्या गेल्या आहेत. गुन्हेगार तरुण किंवा प्रौढ असू शकतो म्हणजेच तो १८ वर्षे वयाच्या आतला किंवा पुढचाही असू शकतो. काही घटनातर तेरा चौदा वर्षांच्या बालकांनी त्यांच्याच वर्गमित्रांवर किंवा इतर लहान बालकांवर लैंगिक अत्याचार केल्याचीही उदाहरणे आहेत. त्यामुळे लैंगिक क्रियांमध्ये बालके सुद्धा काही वेळा यात गुंतलेली असू शकतात. हे लक्षात घ्यायला हवं. एकदा एका किंवा अनेक बालकाला लैंगिक गुन्हेगार/ अपराधी म्हणून संबोधित करण्यापूर्वी किंवा त्यावेळी त्या परिस्थितीचा आढावा घेणे आवश्यक आहे.



## पोक्सो कायद्याचा सोपा अर्थ

बालकासोबत लैंगिक क्रिया करणारी कोणतीही व्यक्ती (मग ती बालक असली तरीही) विरोधात खटला दाखल करता येऊ शकतो.(बालक याचा अर्थ १८ वर्षांखालील ती कोणतीही व्यक्ती असा आहे.) बालकांनी एकमेकांसोबत किंवा प्रौढ आणि बालकां -मधील लैंगिक संबंध सहमतीने झाले असले तरी हा कायदा त्यास मान्यता देत नाही. (लिंगप्रवेशाचा अत्याचार (कलम ४ : शिक्षा १० वर्षे आणि आजीवन कारावासाची तरतूद यात केली आहे.) हा कायदा लैंगिकदृष्ट्या तटस्थ आहे.




तो त्यावर ठाम आहे. त्यावरील काही अत्याचार व कलम

अ) गंभीर स्वरूपाचा लिंगप्रवेशाचा अत्याचार (कलम ६ : शिक्षा २० वर्षे तसेच मृत्युदंड)

ब) लैंगिक आघात (कलम ८ : शिक्षा ३ ते ५ वर्षे)

क) गंभीर प्रकारचा लैंगिक आघात (कलम १० : शिक्षा ५ ते ७ वर्षे)

ड) लैंगिक छळ (कलम १२ : शिक्षा ३ वर्षांपर्यंत आणि दंड)

इ) अश्लील साहित्य निर्मितीसाठी बालकाचा वापर (कलम १५ : शिक्षा ३ वर्षांपर्यंत)



ई) गुन्हा करण्यास उत्तेजन देणे / मदत करणे.

उ) गुन्हा करण्याचा प्रयत्न करणे.

**गुप्त गोष्टी :** कोणाकडून घाणेरडा स्पर्श होत असेल तर गप्प राहू नका. आपल्या आई-वडिलांना याबद्दल सांगा

## ३ गुन्हेगाराचा परिचय

गुन्हेगार कोणीही असू शकतो. पुरूष, स्त्री, तृतीयपंथी इ. बहुतांश वेळा गुन्हेगार पुरूष असतो पण काही वेळा स्त्री हा गुन्हेगार असते. गुन्हेगाराचे लिंग किंवा त्याचे बाह्य रुप यावरुन तो / ती बाल लैंगिक अत्याचारी आहे अथवा नाही हे ठरत नाही. गुन्हेगाराची सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक किंवा शैक्षणिक पार्श्वभूमी कोणतीही असू शकते. ते कदाचित विवाहित असतील किंवा नसतील. ते मानसिकदृष्ट्या स्थिर असू शकतात किंवा नसतात. थोडक्यात, अगदी सर्वसामान्य माणूससुद्धा बाललैंगिक गुन्हेगार असू शकतो.



## ४ गुन्हेगार आणि बालकाचे नाते/संबंध

बहुतेक प्रकरणांत गुन्हेगार हा बालकाच्या परिचयाचा असतो. काही सर्वेक्षणांत असे आढळून आले की स्त्री आणि बालकांबरोबरच्या लैंगिक हिंसेच्या बहुतांश संबंधातला आरोपी ही माहितीतली किंवा नात्यातली व्यक्ती असते. वडील, सावत्र वडील, आजोबा, काका, चुलत भाऊ-बहिणी असे कुटुंबातले जवळचे सदस्यसुद्धा आरोपी असू शकतात.

बागेत अथवा एकाकी रस्त्यावर बालक असुरक्षित आहेच परंतु घर, मैदान अशा परिचयाच्या ठिकाणीच आपल्या बालकांना सुरक्षित ठेवण्याची गरज आहे. अशा ठिकाणी आपले लक्ष केंद्रित असणे गरजेचे आहे.



## ५ अत्याचारग्रस्त बालकांचा परिचय

अत्याचारग्रस्त बालक कोणीही असू शकते. ते बालक अथवा बालिका असू शकते. लैंगिक अत्याचाराचा धोका दोघांनाही आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते दर चारपैकी एक मुलगी व दर सात बालकांपैकी एक मुलगा जगात लैंगिक अत्याचाराचे बळी पडतात. अर्थात आपल्यावर लैंगिक अत्याचार झाले आहेत याची कबुली न देण्याची किंवा उघड न करण्याची शक्यता बालकांमध्ये जास्त असते. महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या २००७ मधल्या सर्वेक्षणानुसार एकापेक्षा अधिक वेळा लैंगिक अत्याचार सोसलेल्या बालकांमध्ये ५७ टक्के बालके आहेत.

सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक किंवा शैक्षणिक पार्श्वभूमी कोणतीही असली तरी लैंगिक अत्याचाराला बळी पडण्याचा धोका बालकांना जास्त आहे.




**काही उदाहरणे खालीलप्रमाणे आहेत.**

- शारीरिक दुर्बलता असणारी बालके
- निम्न आर्थिक, सामाजिक पार्श्वभूमी असणारी बालके उदा. अत्याचार करु पाहणाऱ्या संभाव्य गुन्हेगाराची जवळीकता असलेली बालके. आई-वडील कामावर गेल्यानंतर लक्ष द्यायला कोणी नसलेली बालके यांचा समावेश आहे.

- स्वत्त्वाची जाणीव नसलेली बालके.
- स्वतःच्या लैंगिकतेबद्दल शंका असणारी बालके.
- एकाकी असणारी व मित्र-आप्तांचा गोतावळा नसणारी बालके.
- घरातील वातावण चांगले नसणारी बालके. उदाहणार्थ-ज्यांच्या घरात सतत वाद-विवाद चालू असतात, ज्या घरांमध्ये बालकांना पुरेसं वात्सल्य मिळत नाही किंवा त्यांच्याकडे लक्ष दिले जात नाही.

## ५ शारीरिक स्पर्शाद्वारे अत्याचार



काही घटनांमध्ये, गुन्हेगाराने स्पष्टपणे बालकाला स्पर्श केलेला असतो. संभोग, बालकाच्या गुप्तांगाशी खेळणे किंवा गुन्हेगारानं त्याच्या गुप्तांगाला बालकाला स्पर्श करायला लावणे, लैंगिक हेतूने बालकाच्या कोणत्याही अवयवाला स्पर्श करणे, लैंगिक हेतूने चुंबन घेणे इत्यादी.

## ६ अशारीरिक संपर्का'द्वारे अत्याचार

बालकाला प्रत्यक्ष स्पर्श न करता लैंगिक अत्याचार केले जाऊ शकतात. गुन्हेगाराकडून बालकाला अश्लील व्हिडिओ (पोर्नोग्राफी) किंवा छायाचित्रे दाखविणे, बालकाचा उपयोग अश्लील साहित्यात करणे, किंवा बालकाला उद्देशून विषयासक्त हावभाव करणे, लैंगिक खेळ खेळणे, लैंगिक हेतू बाळगून बालकाशी इंटरनेटच्या माध्यमातून संपर्क ठेवणे इत्यादी. एखाद्या बालकाने जरी वरील अपराध केले तर त्याच्या विरोधात पोक्सो कायद्याअंतर्गत कारवाई होईल. फरक इतकाच की बाल न्याय (बालकाची देखभाल आणि संरक्षण) कायदा, २०१५ अन्वये कार्यवाही केली जाईल.



## ७ ऑनलाईन लैंगिक अत्याचार

इंटरनेटवरील विविध सोशल नेटवर्किंग साईट्स, ऑनलाईन गेम्स, मोबाईल फोन यांच्या माध्यमातून ऑनलाईन लैंगिक अत्याचार घडतो. बालक, तरुणांना सायबर बलात्कार, लैंगिक शोषण, मानसिक अत्याचार यांचा अनुभव येऊ शकतो. बालके ओळखीच्या व अनोळखी लोकांकडून ऑनलाईन अत्याचाराला बळी पडू शकतात. गुन्हेगार बालकाशी दिवसा - रात्री केव्हाही संपर्क करतात. बालकाला सुरक्षित वाटणाऱ्या त्याच्या शयन कक्षातही ऑनलाईन अत्याचार घडू शकतात. यातून इतरांबरोबर छायाचित्रे, व व्हिडिओ शेयर करणे, त्याचे जतन करणे, आदी प्रकार घडतात.




## भारतामधील बालकांविरुद्धचे लैंगिक गुन्हे






अगदी अलिकडेपर्यंत हा प्रश्न विचारला की एक तर गोंधळलेली शांतता निर्माण व्हायची किंवा असे प्रकार फारच कमी असल्याचे बोललं जायचं किंवा आवर्जून बोलावं इतकं महत्त्व या विषयाला नसल्याचं सांगितलं जायचे परंतु २००७ मध्ये महिला व बाल विकास मंत्रालयाने बाल अत्याचारांवरच्या राष्ट्रव्यापी सर्वेक्षणांचे निकाल जाहीर केले, ज्यात १३ राज्यांमधली साडेबारा हजार बालके सहभागी झाली होती. यातल्या अर्ध्याहून अधिक म्हणजे ५३ टक्के बालकांनी म्हटलं की एकदा किंवा अनेकदा ते लैंगिक अत्याचाराला बळी पडले आहेत.

याचा अर्थ असा की दर दोन बालकांपैकी एकाचे लैंगिक शोषण झालेलं आहे. यातल्या २० टक्के बालकांनी सांगितलं की गंभीर स्वरुपाच्या लैंगिक अत्याचारांना त्यांना तोंड द्याव लागलं. या अत्याचार सोसलेले बालकांमध्ये ५७ टक्के मुले ही होते.



भारतात २०१४ च्या राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरोच्या ( एनसीआरबी ) मते अठरा वर्षांपर्यंतच्या वयातल्या एक लाख लोकसंख्येपैकी २०.१ टक्के बालकांवर लैंगिक अत्याचार झालेले आहेत. बालकांवर झालेल्या बलात्कारांची २०१५ मधली नोंद एकूण १० हजार ८५४ होती. सन २०१४ मध्ये ती १३ हजार ७६६ होती. म्हणजे ती २६.८ टक्क्यांनी घटली. पण पोक्सो कायद्याच्या अंतर्गत येणाऱ्या बाल लैंगिक अत्याचारांची संख्या वाढलेली आहे.

## ९ बाल लैंगिक अत्याचारांची कारणे

जगातल्या सर्व समाजांमध्ये बाल लैंगिक अत्याचारांच्या घटना घडतात व त्याच्या कारणांमध्ये खूप तफावत आढळते.

### लैंगिकतेबद्दलच्या चर्चांवर असणारं बंधन

लिंग आणि लैंगिकता त्यातही विशेषतः बालकांशी संबंधित या बाबींची चर्चा करायला भारतात एक प्रकारची अनिच्छा आणि सांकृतिक लाजाळूपणा आढळतो. बालकां संदर्भातल्या अशा विषयांवर बोलणं प्रौढांना खूप अवघड आणि लाजिरवाणं वाटतं कारण बहुतेकदा अशा 'चर्चा' कशा कराव्यात याची त्यांना अजिबातच कल्पना नसते.

पूरेसं प्रशिक्षण आणि योग्य ज्ञान याच्या अभावी लैंगिकते बद्दलच्या खुळचट कल्पनांचा प्रसार झालेला असतो आणि आपण किशोरावस्थेतल्या बालकांना त्याच अपरिचित, जोखमीच्या व अज्ञानाच्या धोक्यात मोकळं सोडून देतो. या विषयाबद्दलच्या या मौनातूनच लैंगिक अत्याचारांबद्दलचा मुकाटपणा आणि त्याबद्दल अवाक्षरही न काढण्याची शांतता जन्माला येते. कित्येक लैंगिक अत्याचार या मौनात दबून जातात, त्याची कुठेही नोंद होत नाही.

## २ लिंगआधारित हिंसेबद्दलची सहनशीलता

स्त्री आणि बालकांवरील हिंसाचाराकडे दुर्लक्ष करण्याची व काही प्रमाणात त्याला स्वीकारण्याचा लिंग आधारित भेदभाव भारतात नेहमी पाहायला मिळतो. स्त्री किंवा बालकांनी त्यांना आखून दिलेला ' नैतिकतेचा उंबरठा ' ओलांडला की त्यांच्या बाबतीत अशा काही घटना घडतातच किंवा घडू शकतात असं गृहीतच धरुन चाललेलो असतो.



लोकप्रिय माध्यमांमधलं स्त्रियांचं प्रतिनिधित्व आणि लोकप्रिय चित्रपटांमधला पिडित साचेबद्धपण हाही स्त्रिया आणि तरुण बालकां-वरच्या लिंगआधारित हिंसेबद्दल समाजाला असंवेदनशील बनवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो.

### बालकांपेक्षा मोठ्यांना महत्त्व देणारी आणि त्यांच्यावर विश्वास ठेवणारी संस्कृती

बालकांकडे अजूनही पूर्ण विकसित झालेले नागरिक म्हणून पाहिले जात नाही. त्यांचा विचार नेहमीच दुर्लक्षित ठेवला जातो. त्या उलट वडीलधाऱ्यांच्या मताबद्दल मतभेद व्यक्त न करता त्यांचा 'आदर' करण्याची शिकवण बालकांना दिली जाते. त्या विरूद्ध बोलणे त्याचा 'अवमान' ठरविला जातो. त्यामुळे लैंगिक

अत्याचाराला बळी पडलेल्या बालकावर सहसा कोणी विश्वास ठेवत नाही, वडीलधाऱ्याकडून त्याचा / तिच्याबाबतीत असे काही घडू शकते हेच कोणी खरं मानत नाही. लैंगिक अत्याचार झाले तर त्यात त्या ‘बालकाचा दोष’असं पालक आणि समाज मानतो.

## बालकांवरील लैंगिक अत्याचारांच्या नोंदींचा परिणाम

स्त्री आणि बालकांवरच्या लैंगिक अत्याचारांच्या घटनांमध्ये समाज व प्रसार माध्यमे अत्याचारग्रस्तालाच दोषी धरतात. व तशी वेळ त्यांनी ओढवून घेतल्याबद्दल बोलले जाते. प्रत्यक्ष बळी कोण व अपराधी कोण यावरच दृष्टिकोन गमावला जातो आणि बाह्य गोष्टींवरच चर्चा होते. लैंगिक अत्याचारग्रस्त बालकाचा विचार करण्याऐवजी ‘लैंगिक कृत्याला तिची संमती होती का? यावरच चर्चा होते.




## अत्याचारग्रस्त व त्याच्या कुटुंबीयांना प्रत्यक्ष आणि संभाव्य धमकी

लैंगिकतेवर बोलायचंच नाही या बंधनाची संस्कृती आपण लादून घेतो आणि जोडीला बळी पडलेल्या व्यक्तीलाच दोष देत बसतो तेव्हा हे उघड आहे की बहुतांश पीडित तक्रार देण्यासाठी पुढे येत नाही. समाज आपल्यावर कलंकित असल्याचा शिक्का मारेल अशी भीती त्यांना वाटते. अपराधी माणूस जर महत्त्वाच्या सत्तापदावर असेल तर पीडिताला, पीडिताच्या कुटुंबाला धमकावू (कधी हिंसक तर कधी जीवघेण्या पद्धतीने) शकतो. ज्या संस्कृतीमध्ये पौरुषाचा अभिमान बाळगण्याची पद्धत असते त्या संस्कृतीमधल्या बालकांवर लैंगिक अत्याचार झाले व ते उघड केले तर समाज आपल्यावर ‘बायल्या’ असा शिक्का मारील अशीही धास्ती बालकांमध्ये असू शकते.

## बालके अत्याचाराची वाच्यता का करत नाहीत, याची सात कारणे

- आपल्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही याची भीती वाटणे.
- आपल्यावर अत्याचार झाला यात आपलीच काही तरी चूक असावी असा अपराध भाव मनात असतो.
- अत्याचारासंदर्भात जेव्हा कधी पीडित व्यक्ती बोलते तेव्हा त्या धक्कादायक प्रसंगाची कटू आठवण होते आणि त्यामुळं ती प्रत्येक वेळी पुन्हा कोसळते. म्हणूनच बालकांना पुन्हा त्या अत्याचाराची आठवण नकोशी वाटते.
- अत्याचार ज्याने केला ती व्यक्ती आपल्याशी नातं तोडेल किंवा ती अडचणीत येईल, याची भीती बालकांना वाटते. बालकांना चुकीच्या पद्धतीने वाढविल्याने किंवा गुन्हेगार कुटुंबातलाच सदस्य असल्यास ही शक्यता जास्त असते.
- आपल्यातलं नातं नैसर्गिक आहे यावर बालकाचा विश्वास बसेल, या पद्धतीने गुन्हेगार बालकाच्या मनात भ्रम निर्माण करू शकतो. आपल्यावर अत्याचार होतोय,याचीच काही वेळा बालकाला जाणीव होत नाही.
- सूड घेतला जाण्याच्या किंवा अत्याचाराची पुनरावृत्ती होण्याच्या भीतीने पीडित बालक गप्प राहते.
- सामान्यतः बालकांना त्याच्या भावना मोकळेपणांनं व्यक्त करण्याची संधीच दिली जात नाही आणि जेव्हा ते बोलतात तेव्हा मोठी माणसं ते ऐकत नाहीत किंवा त्यावर विश्वास ठेवत नाहीत.

## ‘पोक्सो’ सर्वसमावेशक कायदा




पोक्सो हे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १५ (३) च्या अनुषंगाने आहे. ज्यात सरकारला बालकांसाठी विशेष तरतूद करण्याची परवानगी मिळते. ‘पोक्सो’ म्हणजे २०१२ च्या ‘लैंगिक गुन्ह्यापासून बालकांचे संरक्षण’ याचा संक्षेप होय. या कायद्याच्या अस्तित्वामुळे जो लैंगिक गुन्हेगारीला बळी पडणाऱ्या बालकांना न्याय देत असून त्या बालकाचे हित आणि कल्याण यांचे रक्षण करणारा सर्वात व्यापक कायदा भारताला मिळाला आहे. बाल संरक्षणाच्या दृष्टीने या कायद्याची निर्मिती हा मैलाचा दगड आहे.


खरं तर २०१२ पूर्वी, बाल लैंगिक अत्याचारांच्या विरोधातले कोणतेही कायदे भारतात नव्हते. बालकांवरील अत्याचाराची नोंद भारतीय दंडसंहिते ( आयपीसी ) अंतर्गत केली जायची. ज्यामुळे जोवर थेट संभोग होत नाही तोवर बालकांना पोर्नोग्राफी दाखवणं यासारख्या अनेक लैंगिक अत्याचारावर गुन्हे नोंदले जात नसत. बालकांवर लैंगिक अत्याचार करणाऱ्यांना न्यायालयात खेचता येईल अशा तरतुदी त्यात केलेल्या नव्हत्या.




न्याय व्यवस्थेसमोर जाण्याचे खडतर आव्हान पीडित आणि कुटुंबापुढे असायचे. गुन्हेगाराकडून पीडित बालकाला विचारले जाणारे तिखट प्रश्न आणि त्या सगळ्यांची प्रसिद्धी माध्यमांतून वार्तांकन होण्याची शक्यता म्हणजे यात पीडित बालकाला पुन्हा एकदा त्या नरकयातना भोगायला लावण्याचा धोका होता.

न्यायदानातील विलंबामुळे पीडित बालक पुन्हा पुन्हा त्याच अत्याचाराच्या प्रसंगात ढकलत जात होता. व त्याच्या कुटुंबीयांचं आयुष्य उद्‌ध्वस्त होण्याची भीती होती. पुरावे देण्याचा सगळा भार पीडित बालकावर असायचा, अपराध्यावर नव्हे.

प्रत्यक्षात जितके गुन्हे घडले त्या तुलनेत नोंदल्या गेलेल्या प्रकरणांची संख्या फारच कमी होती. नोंदल्या गेलेल्या खटल्यांमधील बालके चौकशी आणि सुनावणी दरम्यान कोसळून जायची. पुढं त्या पीडितानं निश्चय केला तरी सामाजिक कलंकापासून सुटका करुन देणारी संस्थात्मक सुरक्षा त्यांना उपलब्ध नव्हती.



## ‘पोक्सो’ कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी

- **पुरावे देण्याची जबाबदारी गुन्हेगारावर**

  पोक्सो कायदा खास यासाठी ठरतो, की यात पीडित बालकांवर पूर्ण विश्वास टाकण्यात आला आहे. उलट आरोपी निष्पाप असल्याचं सिद्ध करण्याची संपूर्ण जबाबदारी त्या / तिच्यावर टाकण्यात आली आहे. जोपर्यंत वेगळं काही सिद्ध होत नाही तो वर संबंधित व्यक्तीनं गुन्हा केला आहे. गुन्ह्याचा प्रयत्न केला आहे असंच विशेष न्यायालय गृहीत धरतं.

- **पोक्सो कायदा लिंग तटस्थता मानतो**

  अठरा वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलगा आणि मुलगी या दोघांच्या विरोधातील लैंगिक गुन्ह्यांची दखल घेतली जाते.

- **लिंग आणि वय यात भेद न करता सर्व गुन्हेगारांच्या शिक्षेची तरतूद पोक्सो कायद्यात आहे.**

  पोक्सो कायदा लिंग व वयांबाबत काटेकोर पालन करते. १८ पेक्षा कमी वयाच्या बालकांवर होणारा अत्याचार पोक्सो कायद्याला कदापी मान्य नाही.

- **गुन्हेगारीचे अंशांकन**

  विस्तृत लैंगिक अत्याचारांची दखल पोक्सो कायद्याने घेतली आहे. पूर्ण लिंग प्रवेश, अंशतः लिंग प्रवेश, लिंग प्रवेशरहित अत्याचार, बालकांना पोर्नोग्राफी दाखवणं, बालकाचा वापर पोर्नोग्राफीसाठी करणं, लैंगिक हेतूनं बालकांचं प्रर्दशन इत्यादी. शारीरिक आणि अशारीरिक संपर्काच्या सर्व अत्याचार प्रकारांपासून कायदा बालकांचे संरक्षण करतो.



- **संरक्षकच जर गुन्हेगार बनले तर अशांना कठोर शिक्षेची तरतूद**


  विश्वास, अधिकार व सत्तापदावर असलेल्या व्यक्तीनं उदा.पोलिस अधिकारी, संरक्षण दलांतील सदस्य किंवा सरकारी नोकर इत्या. (कलम ५ व ९) लैंगिक गुन्हा केला तर अशा व्यक्तीच्या विरोधात पोक्सो कायद्यात कठोर शिक्षेची तरतूद केलेली आहे.

- **बालस्नेही उपायांची तरतूद**

  लोक, व्यवस्था आणि कार्यपद्धती संवेदनशील असावी आणि बालकांच्या गरजांना प्रतिसाद देणारी असली पाहिजे. हे पोक्सो कायद्याला अपेक्षित आहे. उदाहरणार्थ लैंगिक गुन्ह्याची तक्रार देण्यासाठी बालकाला पोलिस ठाण्यात नेण्याची गरज नाही, असं कायदा स्पष्टपणे सांगतो. उलट पोलिसांनी स्वतः बालकाकडे जावे, तेही पोलिसी गणवेशात नव्हे, तर साध्या वेशात (कलम २४)

- **पीडित बालक आणि कुटुंबीयांना आधार**

  बाललैंगिक गुन्ह्यांची तक्रार पोलिसांकडे देण्याची जबाबदारी पोक्सो कायद्याने प्रत्येक नागरिकाला बंधनकारक केली आहे. (कलम १९)



- **तक्रार देण्यात किंवा नोंदवण्यात चूक झाल्यास शिक्षा**

  बाललैंगिक गुन्ह्यांची तक्रार देण्यात किंवा नोंदवण्यात चूक झाली तर तो दंडनीय गुन्हा आहे.




## न्यायालयालाही विशेष अधिकार नाहीत.

पोक्सो खटल्यांच्या सुनावणीत कोर्टाला विवेकाधीन अथवा विशेष अधिकारांचा वापर करता येणार नाही. कायद्याने निश्चित केलेली किमान शिक्षा कमी करण्याचा अधिकार न्यायालयालाही नाही.

## बालकांची व कुटुंबीयांची गोपनीयता

प्रसार माध्यमांनी बालकाची ओळख व गोपनीयता सुरक्षित ठेवली पाहिजे. पीडित बालकाचे नाव, पत्ता, शेजार, शाळेचे नाव किंवा इतर तपशील याद्वारे बालकाची ओळख जाहीर करणे किंवा प्रसिद्ध करणे हा दंडनीय गुन्हा आहे ज्यात किमान सहा महिन्यांचा किंवा कमाल एका वर्षाचा तुरुंगवास आणि आर्थिक दंड किंवा दोन्हीची तरतूद आहे. बालकाच्या प्रतिष्ठेला बाधा येणारे नकारात्मक वार्तांकन करण्यासही बंदी आहे. बालकाच्या हितासाठी काही गोष्टी खुल्या करण्यास विशेष न्यायालय परवानगी देऊ शकते. (कलम २३)

